Literacy for a Billion

Movie: Bhet
Year: 2002

Song: Tujhya Akshrana Kase Pankh
Lyricist:

तुझ्या अक्षरांना
कसे पंख आले
मना जाळती रे
तुझे शब्द ओले
तुझ्या अक्षरांना
कसे पंख आले
मना जाळती रे
तुझे शब्द ओले
कुणी शिकविली ही
लिपी जीवघेणी
मला सांगते
सोसण्याची कहाणी
तुझ्या अक्षरांना
कसे पंख आले
मना जाळती रे
तुझे शब्द ओले

दिवस असा हा भिरभिरणारा
दिवस असा हा भिरभिरणारा
मनासारखा
पिसासारखा
मी एक पक्षी तरंगणारा
दिवस असा हा भिरभिरणारा
फुलून आला जगण्याचा क्षण
हलके हलके झाले हे मन

शीळ ही घुमवीत वाऱ्यावरती
कोकीळ बसली फांदीवरती
तान ऋतूची झेलणारा
धा धिन् धा धिन् नाचणारा
मनासारखा
पिसासारखा
मी एक पक्षी तरंगणारा

कुणा दाखवू मी
लडिवाळ बोल
अस्वस्थ सारे
उरी घालमेल
मला बोलवेना
तुझ्या अक्षराशी
उभी मी कधीची
जुन्या सावलीशी
तुझ्या आठवांनी
मला भूल येते
तरारून आले
पुन्हा तेच नाते
तुझ्या अक्षरांना
कसे पंख आले
मना जाळती रे
तुझे शब्द ओले

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*